बुधवार दि.१४ ऑगस्ट२०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : ३४६

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    www. lokneta.com



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४




## मनसे अध्यक्ष राज ठाकरे पुढचा दौराही ठरला

# २२ ते २९ ऑगस्ट दरम्यान विदर्भात साधणार संवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

लोकसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. त्यांनी राज्यातील २२५ ते २५० जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी त्यांनी मराठवाडा दौऱ्यादरम्यान चार उमेदवारांच्या नावांची घोषणा देखील केली आहे. त्यानंतर आता २२ ऑगस्टपासून ते विदर्भाच्या दौऱ्यावर जात आहेत. विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. या अनुषंगाने त्यांचा मराठवाडा दौरा नुकताच संपला आहे. २२ ऑगस्टपासून ते विदर्भ दौऱ्यावर असतील. पूर्व विदर्भानंतर पश्चिम विदर्भातील सर्व जिल्ह्यांचा दौरा करून जिल्हास्तरीय पक्ष संघटनेचा आढावा घेणार असल्याचे मनसेच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले. या काळात निवडणूक लढविण्यास इच्छुक चेहऱ्यांचा शोध घेण्याचाही प्रयत्न केला जाऊ शकतो.राज ठाकरे २ दिवस नागपुरात राहण्याची शक्यता वर्तवली जात होती. बुलढाण्यापासून ते विदर्भ दौऱ्याला सुरुवात करणार आहेत. राज्यातील सुमारे अडीचशे जागांवर निवडणूक लढवण्याची घोषणा झाल्यापासून त्यांच्या पक्षाला इतक्या जागांवर जनतेचा पाठिंबा आहे की नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. सध्या विधानसभेत मनसेचा एकच आमदार आहे.राज ठाकरे यांनी विदर्भात रिपब्लिकन आणि आंबेडकरी, ओबीसी आणि मराठा समाजात आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळेही असंतोष व्यक्त केला जात आहे. 'राज्यात आरक्षणाची गरज नाही' अशी विधाने त्यांनी केली होती. अशा स्थितीत ते डॅमेज कंट्रोल कसे करतात, हे आगामी निवडणुकीत पाहायला मिळणार आहे.

## टिटवी येथे जागतिक आदिवासी दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

आज टिटवी येथे ९ आगस्ट ला जागतिक आदिवासी दिन, बिरासा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करून मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. त्यावेळी भारतीय आदिवासी पँथर संघटना बुलढाणा जिल्हा अध्यक्ष,गजानन कोकाटे यांच्या तर्फे टी शर्ट वाटप करण्यात आले.त्यावेळी तेथे उपस्थित मा, उपसरपंच दशरथ कोकाटे, तंटामुक्ती अध्यक्ष रामचंद्र कोकाटे, गजानन गिते,शंकर कोकाटे विष्णू तुनपुरे, राम माघाडे ग्रा, सदस्य यांच्या हस्ते तरुण युवा मंडळींना,टी शर्ट वाटप करण्यात आले . जागतिक दिन साजरा करताना टिटवी, नांद्रा रायगाव गोत्रा येथील तरुण युवा वर्ग उपस्थित व रावण युवा सेना ००७ चे सर्व



कार्यकर्ते व सर्व पदाधिकारी आदिवासी युवा तरुण मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. तरुण युवा मंडळींनी आपल्या गाडीला झेंडे लावून व बिरासा मुंडा यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली.या कार्यक्रमा निमित्त गावातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

## शहीद राघोजी भांगरे व शहीद बिरसा मुंडा संयुक्त जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

तालुक्यातील शेरी बु येथे आद्यक्रांतिकारक शहीद राघोजी भांगरे तसेच क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचा सयुंक्त जयंती सोहळा संपन्न झाला. त्यावेळी गावातील तरुण वर्ग तसेच गावकरी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे तसेच बिरसा मुंडा यांच्या समाजाविषयी कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक वर्षी संयुक्त जयंती साजरी केली जाते.राघोजी भांगरे यांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात बंड पुकारून इंग्रजांना पळवून लावले होते.आदिवासी समाजासाठी मोलाचे कार्य करून सावकाराकडून जमिनीस हिसकावून गोरगरिबांना परत केली होती.असे कृष्णा जाधव यांनी आपले विचार मांडले अशा थोर क्रांतिवीराना मानवंदना देऊन



अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना जाधव म्हणाले की, आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात बंड पुकारून इंग्रजांना पळवून लावले होते. तसेच आदिवासी समाजासाठी मोलाचे कार्य करून सावकाराकडून जमिनीस हिसकावून गोरगरिबांना परत केली होती.परंतु आज आम्ही आदिवासी वनवासी नसुन मुलनिवासी आहोत. त्यावेळी परकिय आक्रमणे झाली त्यास आदिवासी समाजाने मोठ्या धाडसाने व शौर्याने परतून लावली होती,परंतु आज आमच्या समाजावर अन्याय केला जात आहे. जातीचे सर्टिफिकेट मिळण्यापासून वंचित ठेवले जाते, आदिवासी असूनसुद्धा लाभ मिळत नाही यामुळे मुलांना शिकवून सुद्धा न्याय हक्क व लाभापासून पासून दुर ठेवले जात आहे. जातपडताळणीच्या नावाखाली मोठ्याप्रमाणात अन्याय केला जात आहे.तरी शासनाने याकडे लक्ष देवून समाजाचा प्रश्न निकाली काढावा अशी सर्वानुमते मागणी यावेळी करण्यात आली यावेळी वैभव होळकर,आजिनाथ वाघमारे राजाराम वाघमारे,सुरेश वाघमारे,श्रीकांत जाधव,आशिष जाधव ओम जाधव.सचिन कांबळे बाबासाहेब वाघुले, बाबासाहेब घोरपडे,बबन गायकवाड,आश्रुबा सरपते, वाल्मिक होळकर आदी समाज बंधू भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार श्री काकासाहेब वाघमारे यांनी मानले.

## सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे यांनी केले कळसकर कुटुंबीयांचे सांत्वन



लोकनेता न्यूज नेटवर्क । लोहा । विशाल घंटे

लोहा शहरातील प्रतिष्ठित व्यापारी कै.विठ्ठलराव गणपती कळसकर यांचे काल अल्प आजाराने दुःखद निधन झाले होते, मंगळवार दि. १३ ऑगस्ट रोजी सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी कळसकर कुटुंबीयांची त्यांच्या राहत्या घरी भेट देऊन कळसकर कुटुंबीयांचे सांत्वन करून धिर दिला , यावेळी हरबळचे सरपंच अवधूत पाटील शिंदे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, चेअरमन नागेश हिलाल, दत्ता कौशल्ये ,खरेदी विक्री संघाचे संचालक सुधाकर सातपुते, भूषण दमकोडवार सतीश कराळे, व्यंकटी आढाव ,प्रसाद जाधव, अमोल गोरे सह इतर पदाधिकारी कार्यकर्ते व कळसकर कुटुंबीय उपस्थित होते.

## नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी आमरण उपोषणाला बसणार




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

शेतकरी सुरेश विठ्ठल मुगावे रा.पेठवडज ता.कंधार जि.नांदेड व शेतकरी राम दिंगाबर गायकवाड रा.रातोळी ता.नायगांव जि.नांदेड या दोघांनाही संदर्भीय पत्रान्वये न्याय मिळाला नाही तर दि.१४/०८/२०२४ रोजी आमरण उपोषणाबाबत कळविण्यात आले आहे.कारण सदरील पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.पण प्रशासनाने त्यावर कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने दि.१४/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक ११ वाजता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचे निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले आहे . निवेदनाची प्रत पोलिस अधिक्षक नांदेड, पोलीस निरीक्षक पोलिस स्टेशन वजीराबाद नांदेड यांना देण्यात आली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे .

## अव्वल कारकून अविनाश पानपट्टे यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महसूल दिनाचे औचित्य साधून कंधार महसूल उपविभागातील अव्वल कारकून अविनाश शंकरराव पानपट्टे यांच्या उल्लेखनीय व उत्कृष्ट आणि प्रशंसनीय कार्याची महाराष्ट्र महसूल विभागाने दखल घेऊन महसूल दिनी नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय,कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विभागीय पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,कंधार उपविभागीय अधिकारी अरूणा संगेवार,यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अव्वल कारकून अविनाश शंकरराव पानपट्टे यांचा यथोचित सन्मान




करून सत्कार केला.पानपट्टे यांना सन्मान व गौरव पत्र मिळाल्याबद्दल केंद्रप्रमुख जयवंतराव काळे बिलोली जि.प.के.प्रा,व काळे परिवार आणि मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

## विदर्भातील जिल्ह्यांना यलो अलर्ट

**पुणे**–राज्यात सध्या अनेक ठिकाणी पावसाने उघडीप घेतलेली आहे. मात्र विदर्भात पावसाचा जोर कायम आहे. आजही विदर्भातील काही जिल्ह्यांना जोरदार पावसाचा याला अलर्ट देण्यात आला आहे. तर मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता आहे. मंगळवारपासून पुढे उत्तरेकडील भागावर १००४ व दक्षिणेकडील भागावर १००६ हेप्टापास्कल इतका हवेचा दाब राहील. त्याचा थेट परिणाम पावसाच्या प्रमाणावर होऊन काही काळ उघडीप, तर हलक्या पावसाची शक्यता राहील.

## चारोळी

**वृक्षापरी सखा**
**दुसरा होणे नाही**
**उभ्या देहाचे दान**
**दुसऱ्याच्या सुखासाठी करत राही.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

### लोहा–कंधार मतदार संघात भगवा सप्ताह निमित्त

## एकनाथ दादा पवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात शिवसेना उबाठा पक्षाची नोंदणी सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

सध्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी लोहा -कंधार मतदार संघासहित शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जोरदार मुसंडी मारलेली असुन लोहा मतदार संघात शिवसेना उबाठा पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उबाठा पक्षामध्ये अनेक नेते कार्यकर्ते सरपंच चेअरमन आदी दिवसेंदिवस प्रवेश करीत असुन आता लोहा -कंधार मतदार संघात गाव तेथे शाखा घर तिथे शिवसैनिक मोहीम चालू आहे.

दि.१२ ऑगस्ट रोजी शिवसेना उबाठा पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात भगवा सप्ताह निमित्त शिवसेना सदस्य नोंदणी सुरू झाली



असून सदरील सदस्य नोंदणीचे उद्घाटन शिवसेना उबाठा चे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या सदस्य नोंदणीला नागरिकांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

### लॉयन्स क्लब सेंट्रल तर्फे

## कै.नाना पालकर प्राथमिक विद्यालयात होतकरू विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचालित कै.नाना पालकर प्राथमिक विद्यालयात लॉयन्स क्लब सेंट्रल नांदेड यांच्यातर्फे मोफत गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

लॉयन्स क्लब यांच्या तर्फेअनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून कै.नाना पालकर प्राथमिक विद्यालयाच्या होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रारंभी भारतमाता आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अहिल्याबाईंचे




हे त्रीजन्मशताब्दी वर्ष असल्याने अहिल्याबाई यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणारे सांघिक गीत प्रारंभी विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यानंतर विद्यालयातील पन्नास होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी बोलताना कै.नाना पालकर प्राथमिक विद्यालय हे नांदेड शहरातील भारतीय संस्कार देणारे विद्यालय आहे. लायन्स क्लब ने गणवेश वाटपासाठी योग्य निवड केली त्याबद्दल लायन्स क्लब चे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ कल्पना कांबळे यांनी करताना लॉयन्स क्लब हे समाजातील खऱ्या गरजुंपर्यंत मदत पोहोचवणारे क्लब असून त्यांचे कार्य हे आदर्श आहे असे प्रतिपादन केले. लॉयन्स क्लब चे रिजनल चेअरपर्सन श्री रवि कडगे यांनी कै. नाना पालकर ही संस्कार देणारी मराठी माध्यमाची आदर्श शाळा असून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. अध्यक्षीय समारोप करताना भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई शाखा नांदेडचे अध्यक्ष डॉ मापारे यांनी लॉयन्स क्लब ला विशेष धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ देशपांडे यांनी केले तर आभार सौ. सोनटक्के यांनी मानले. वैयक्तिक गीत इ.आठवीची कु. आनंदी जोशी हिने सादर केले. कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी लायन्स नांदेड सेंट्रलचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवाजी पाटील, झोन चेअरपर्सन शिवकांत शिंदे तसेच सचिव गौरव दंडवते, कोषाध्यक्ष दीपेश छेडा आणि प्रकल्प अधिकारी प्रवीण जोशी यांनी परिश्रम घेतले.

संपादकीय

# निवडणुकांचा माहोल



लोकनेता न्यूज नेटवर्क

ऑक्टोबरच्या मध्यावर विधानसभेच्या निवडणुका होणार हे निश्चित आहे. पुढच्या महिन्यात आचारसंहिता जाहीर होणार, याचा अंदाज प्रत्येक पक्षाला आला आहे. त्यामुळेच अजित पवारांची जनसन्मान यात्रा, शरद पवार, जयंत पाटील यांची शिवस्वराज्य यात्रा, राज ठाकरेंची नवनिर्माण यात्रा, प्रकाश आंबेडकरांची आरक्षण बचाव यात्रा, काँग्रेसची मुंबई न्याययात्रा... अशा यात्रांचे पेवच महाराष्ट्रात फुटले आहे. येत्या १६ ऑगस्टला महाविकास आघाडी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात प्रचाराचा नारळ वाढवणार असून २० ऑगस्टला राजीव गांधींच्या जयंतीनिमित्त काँग्रेसच्या सभेने महाविकास आघाडीच्या प्रचाराची सुरुवात होत आहे. याला प्रत्युत्तर म्हणून महायुती त्याच दिवशी कोल्हापूरमध्ये महालक्ष्मीचे दर्शन घेऊन महासंवाद यात्रेला सुरुवात करत आहे. एकंदर लोकसभेपेक्षा विधानसभेचा प्रचार खूपच लवकर सुरू होतो आहे. याचे कारण, राज्यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी व काँग्रेस आणि भाजप हे सहा पक्ष युती आणि आघाडीद्वारे एकमेकांना भिडणार आहेत. या पक्षांसमोर मित्रपक्षांना सोडायच्या जागांमुळे स्वपक्षात होणारी नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान आहे. प्रचाराचा धडाका जोरात असला तर विरोधकांपेक्षा स्वपक्षातील इच्छुकांच्या बंडखोरीलाही चाप बसतो. तसेच, लोकसभेपेक्षा विधानसभेची गणितं अधिक क्लिष्ट असल्यामुळे जागावाटप होण्यापूर्वीच राज्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये प्रत्येकजण यात्रांच्या निमित्ताने आपापली ताकदही आजमावून पाहात आहे.लोकसभेत महाविकास आघाडीला मिळालेल्या यशामुळे त्यांचे मनोबल खूपच उंचावले आहे. मात्र, लोकसभेची निवडणूक ही राष्ट्रीय प्रश्न आणि त्या भोवती तयार झालेल्या प्रचाराच्या हवेवर लढली जाते. विधानसभेत मात्र पक्षाची प्रचार यंत्रणा जितकी महत्त्वाची, तितकेच उमेदवाराचे मतदारसंघातील वजन व त्याची लोकमान्यता यालाही खूप महत्त्व असते. त्यामुळे लोकसभेला नवख्या उमेदवारांना उभे करून निवडून आणणे महाविकास आघाडीला जितके सहज शक्य झाले; तितकी सोपी विधानसभेची निवडणूक असेलच, याची खात्री नाही. एकतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी व उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांचे बहुतांश आमदार अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षात गेल्याने शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्या पक्षांकडे तगड्या उमेदवारांची मोठी वानवा आहे. दुसरीकडे, काँग्रेस पक्षात फूट न पडल्याने त्यांना उमेदवार निवडीसाठी फारसे कष्ट घ्यावे लागले नाहीत; तरी काँग्रेसला राज्यात चेहरा नाही. नेतृत्वहीन असूनही लोकसभेत आमच्या सर्वाधिक जागा निवडून आल्या, हे उसने अवसान आता राज्यातील नेतृत्व आणत असले तरी काँग्रेसचे दिल्लीतील नेतृत्व व राज्यातीलही समजूतदार नेते आघाडीतील पवार-ठाकरे द्वयीच्या नेतृत्वाशिवाय तरणोपाय नाही, हे ओळखून आहेत.

महायुतीत मात्र भाजपसमोर जागावाटपाचा मोठा पेच आहे. गेल्या निवडणुकीत भाजपने १०५ जागा जिंकल्या होत्या. तसेच, दहा अपक्ष आमदारही त्यांच्या वळचणीला असल्यामुळे भाजप वाटपात १४० जागांपेक्षा कमी जागा ठरवले तरी घेऊ शकत नाही. त्यामुळे, उरलेल्या १४८ जागांकरिता लोकसभेला अवघी एक जागा जिंकता आलेली अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सात जागा जिंकलेली शिवसेना यांच्यात मोठी रस्सीखेच होणार, यात शंका नाही. त्यातच मराठवाड्यात मनोज जरांगे हे अद्याप शांत झालेले नाहीत. ते सातत्याने महायुतीतील व विशेषतः भाजपमधील नेत्यांवर अत्यंत कडवट टीका करत आहेत. त्याकडे दुर्लक्ष केले तर टीका योग्य असल्याचा गैरसमज जनतेत पसरण्याची भीती व उत्तर दिले तर नव्या तंत्रज्ञानाचे आविष्कार असलेल्या समाज माध्यमांवर फक्त तेवढेच दिसत राहाते ही अडचण, अशा कात्रीत भाजप सापडला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने सर्वपक्षीय नेतृत्वाकडून राज्यातील प्रश्नांचा ऊहापोह कितपत होईल व त्यावर आधारीत मतदान किती होईल, हे प्रचारातील मुद्दे व लागलेले निकाल पाहिल्यावरच समजेल. मात्र, एका बाजूने जातीचा वापर केला जाणार हे दिसत असल्याने दुसऱ्या बाजूकडून धर्माचा वापर करण्याचीही जय्यत तयारी सुरू आहे. लोकप्रिय योजनांच्या घोषणा उर्वरित अर्थसंकल्पात करून झाल्या असून आता तेही ढोल बडवले जात आहेत. गरिबांच्या कल्याणाकरिता या बडवल्या जाणाऱ्या ढोलांचा आवाज फारसा मोठा नाही, असे सांगत विरोधक आमच्या हाती सत्ता द्या आम्ही यापेक्षाही मोठे ढोल बडवून दाखवू, असे सांगत आहेत. सामान्यांच्या कल्याणाच्या आणाभाकांना जात, धर्म, भाषा आदींची खमंग फोडणी दिली जात आहे. एकंदर श्रावणातील सणांना झालेली सुरुवात व येऊ घातलेला गणेशोत्सव यापेक्षा लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव समजल्या जाणाऱ्या निवडणुकांचाच माहोल आता अधिक ठाशीव होऊ लागला आहे.

# विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणार १४९ कोटींस मान्यता

लोकनेता न्यूज नेटवर्क

विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकासाला गती देण्यासाठी दुग्धविकास प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी १४९ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाची एकूण किंमत ३२८ कोटी ४२ लाख इतकी असून यापैकी १७९ कोटी १६ लाख हिस्सा हा शेतकरी आणि पशुपालकांचा आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्स करण्यामध्ये शेती व शेतीपूरक व्यवसायांचा समावेश असून यामध्ये दुग्ध व्यवसायाचा देखील वाटा आहे त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

विदर्भ आणि मराठवाड्यातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, गडचिरोली, अमरावती, अकोला, छ.संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, धाराशिव आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प २०२६-२७ पर्यंत राबविण्यात येईल. यापूर्वी २०१६ मध्ये हा प्रकल्प विदर्भ मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला होता. या प्रकल्पात गोठीत रेतमात्रांचा वापर करून कृत्रिम रेतनाची व्यवस्था तसेच भ्रूण प्रत्यारोपण करून दुधाळ जनावरांची संख्या वाढविणे, शेतकऱ्यांना वैरण विकास कार्यक्रम, संतुलित आहार आणि दर्जेदार चारा पुरवठा करणे, पशु आरोग्य सुविधा पुरविणे, उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गाई म्हशींचे वाटप करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून रोजगार निर्मिती देखील करणे अशी उद्दिष्टे आहेत. या ३ वर्षांच्या कालावधीत या १९ जिल्ह्यात १३ हजार ४०० दुधाळ गाई आणि म्हशींचे वाटप करण्यात येईल. या प्रकल्पाचे मुख्यालय नागपूर येथे राहील. तसेच जिल्हा प्रकल्प अधिकारी याची अंमलबजावणी करतील.

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना**

डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या तीनही संस्था शासनाच्या अधिपत्याखालील अभिमत विद्यापिठे आहेत. त्यामुळे शासनाच्या अनुदानित महाविद्यालयांना लागू असलेली वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना त्यांना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**वस्त्रोद्योग विभाग**

**यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील**

यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

२७ अश्वशक्तीपेक्षा जास्त परंतु २०१ अश्वशक्तीपेक्षा कमी अशा यंत्रमागांना प्रती युनिट ७५ पैसे तसेच २७ अश्वशक्तीपेक्षा कमी भाराच्या यंत्रमागांना प्रती युनिट १ रुपया अतिरिक्त वीज दर सवलत लागू करताना असलेली नोंदणीची अट शिथिल करण्यात येईल. विविध लोकप्रतिनिधी तसेच वस्त्रोद्योग संघटना व यंत्रमाग घटकांना ही अट रद्द करण्याबाबत निवेदने दिली होती.

**वैद्यकीय शिक्षण विभाग**

**सेवानिवृत्त चिकित्सालयीन व अतिविशेषोपचार प्राध्यापकांना ठोक मानधन**

शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील चिकित्सालयीन व अतिविशेषोपचार प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांना करार पद्धतीने मानधन देण्यात येते. जास्तीत जास्त प्रमाणात प्राध्यापक उपलब्ध व्हावेत तसेच विद्यार्थी आणि रुग्णांना त्याचा लाभ व्हावा म्हणून एक विशेष बाब म्हणून सेवानिवृत्त अध्यापकांना एक ठोक रकमी मानधन देण्याचा प्रस्ताव होता. त्यानुसार आता उर्वरित महाराष्ट्रासाठी प्राध्यापकांना १ लाख ८५ हजार आणि सहयोगी प्राध्यापकांना १ लाख ७० हजार तसेच दूरस्थ क्षेत्रातील महाविद्यालयांसाठी प्राध्यापकांना २ लाख आणि सहयोगी प्राध्यापकांना १ लाख ८५ हजार मानधन देण्यात येईल.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण**

**सुधारित ३७ हजार कोटी खर्चास मान्यता**

सुधारित हायब्रिड न्युईटी योजनेत राज्यातील सहा हजार किमी रस्ते डांबरीकरण करण्यात येणार होते मात्र त्याऐवजी या रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित ३६ हजार ९६४ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.डांबरीकरणासाठी यापूर्वी दिलेल्या मान्यतेनुसार २८ हजार ५०० कोटी खर्च अपेक्षित होता. या नव्या निर्णयामुळे सुधारित हायब्रिड न्युईटी योजनेत शासनाच्या सहभागाची रक्कम २५८९ कोटी इतकी वाढली असून एकूण शासन सहभागाची रक्कम ११ हजार ८९ कोटीस मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या सहभागाची रक्कम ५८७५ कोटी इतकी वाढली आहे. हे ६ हजार कि.मी.चे रस्ते महामंडळाला १७.५ वर्षे कालावधीसाठी हस्तांतरीत करण्यात येतील.

**महसूल विभाग**

**मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय**

**लाखो नागरिकांना लाभ**

मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या निर्णयाचा लाभ लाखो नागरिकांना होणार असून ६० वर्षांपासूनची मागणी निकाली निघणार आहे.

या अनुषंगाने हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ आणि हैद्राबाद अतियात चौकशी अधिनियम १९५२ मध्ये सुधारणा करण्यात येतील. मराठवाडयातील मदतमाश जमीनीच्या (केलेल्या कामगिरीसाठी इनाम दिलेल्या जमिनी) अकृषिक प्रयोजनाकरिता वर्ग १ मधील रुपांतरणासाठी नजराण्याची रक्कम चालू बाजारमूल्याच्या ५० टक्के ऐवजी ५ टक्के इतकी आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे सदर समितीच्या शिफारशीनुसार हैद्राबाद अतियात अनुदान चौकशी अधिनियम, १९५२ च्या कलम ६ मध्ये दुरुस्ती करुन काही प्रमाणात जमीनी हस्तांतरण योग्य करण्याचादेखील निर्णय घेण्यात आला.

मराठवाडा विभागाच्या आठही जिल्ह्यात ४२ हजार ७१०.३१ हेक्टर जमीन ही अतियात अनुदान किंवा खिदमतमाश इनाम जमिनी (देवस्थानाच्या देखभालीसाठी दिलेल्या जमिनी) आहेत. तसेच १३ हजार ८०३.१३ हेक्टर जमीन ही मदतमाश इनाम जमीन आहेत.

मराठवाडा विभागातील मदतमाश इनाम जमिनींना हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ मधील तरतूदी लागू होतात. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये हैद्राबाद इनामे व रोख अनुदान रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ चे कलम ६(१) च्या तरतूदीनुसार दि.०९.०७.१९६० चे शासन परिपत्रकानुसार तत्कालीन परिस्थितीमध्ये दि.०१.०७.१९६० रोजी इनामदार यांच्याकडील जमीनी खालसा (-लेश्रळींळेप) करुन शासनाकडे निहित करण्यात आल्या. त्यानंतर सक्षम अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरण व विभाजन करण्यास प्रतिबंध ठेवून नवीन अविभाज्य भोगवटादार २ च्या शर्तीवर इनामदार, काबीज-ए-कदीम, कायम कुळ व साधे कुळ यांचेकडून जमीनीचे तत्कालीन परिस्थितीत नजराणा/भोगवटा मुल्य घेवून पुनःप्रदान (ठशसीरपीं) करण्यात आले आहे.

मराठवाडा विभागातील मदतमाश इनाम जमिनींच्या हस्तांतरणावर हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ चे कलम ६ (३) अन्वये निर्बंध होते. मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी धारण केलेल्या इनाम जमिनींचे बेकायदेशीररित्या हस्तांतरणे झालेली आहेत. या जमिनीवरील निर्बंध कमी करण्यासाठी हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम, १९५४ मध्ये सन २०१५ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ५० टक्के नजराण्याची रक्कम घेवुन या जमीनी वर्ग-१ करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि, त्यानंतरही या इनाम मिळकतीच्या हस्तांतरणासंदर्भात आणखी काही निर्बंध कमी करणे आवश्यक होते. याबाबत विविध लोकप्रतिनिधी यांचेकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार श्री.अविनाश पाठक, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे अध्यतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला होता. तसेच बीड जिल्ह्यातील देवस्थान इनाम जमिनीच्या अनधिकृत हस्तांतरणाबाबत प्राप्त तक्रारींबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी गठीत केलेल्या समितीच्या अहवालात केलेल्या शिफारशीस अनुसरुन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान अधिनियम १९५४ च्या कलम २ (ए) (३) मध्ये नमूद १ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर अपवादात्मक प्रकरणी उप कलम (१) अन्वये घेण्यात आलेल्या प्रकरणांची कायदेशीर वैधता, नियमितता तपासण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीची मर्यादा वाढविणे आवश्यक होते. त्याचा विचार करुन या अधिनियमाच्या कलम २ (ए) मधील तरतुदीनुसार जमीनीचा प्रकार ठरविलेल्या प्रकरणांचा अपवादात्मक प्रकरणी फेरविचार करण्यासाठी शासनाच्या मान्यतेने विभागीय आयुक्त यांना पुर्ननिरक्षणाचे अधिकार प्रदान करण्याकरिता हैदराबाद इनामे आणि रोख अनुदाने नष्ट करणे अधिनियम, १९५४ च्या कलम २ ए (३) मध्ये सुधारणा करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.

**नगरविकास विभाग**

**नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे**

राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येतील. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या असून त्याचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षाचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येईल.

**ऊर्जा विभाग**

**सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार**

राज्यातील ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या प्रकल्पांच्या खर्चापोटी १५६४ कोटी २२ लाख ऐवजी १४९४ कोटी ४६ लाख किंमतीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार काऊंटरपार्ट फंडींग प्रकल्पाच्या कमीत कमी ३० टक्के असावे म्हणून सुधारित वित्तीय पॅटर्ननुसार कर्जाचे प्रमाण प्रकल्प खर्चाच्या ८५ टक्के ऐवजी ७० टक्के ठेवण्यास मान्यता देण्यात आली. केएफ डब्ल्यू कंपनीचे १३० दशलक्ष युरो इतके कर्ज ०.०५ टक्के व्याज दराऐवजी २.८४ टक्के प्रती वर्ष या स्थिर व्याजदराने कमाल १२ वर्षात परतफेड करण्यात येईल. हे प्रकल्प यवतमाळ, वाशिम तसेच चंद्रपूर जिल्ह्यात उभारण्यात येत आहेत.

# गरिबांचा बँकर ते आश्वासक नेतृत्व

लोकनेता न्यूज नेटवर्क

'इफ यू इमॅजिन, इट कॅन हॅपन, इफ यू डोंट इमॅजिन, इट विल नेव्हर हॅपन'. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख, अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांच्या ग्रामीण फाऊंडेशनच्या संकेतस्थळावरील हे वचन. त्याच्या अर्थाप्रमाणे, युनूस यांनी सरकारच्या प्रमुखपदी विराजमान होण्याची कल्पना केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र, अभूतपूर्व अराजकाच्या स्थितीत देशाचे नेतृत्व करावे लागेल, अशी पुसटशी कल्पनाही त्यांनी केली असण्याची शक्यता कमीच. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, 'हे देशाचे दुसरे स्वातंत्र्य आहे.' 'हे स्वातंत्र टिकवायला हवे, बांगलादेशने पुन्हा उभारी घ्यायला हवी', अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली आहे. ती पूर्ण होईल का, हा प्रश्न तूर्त अनुत्तरित असला तरी युनूस यांचा पूर्वेतिहास आश्वासक ठरतो.बांगलादेशच्या चितगाँगमध्ये १९४०मध्ये जन्मलेले युनूस हे त्यांच्या आईवडिलांच्या नऊ अपत्यांपैकी तिसरे. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी ढाका विद्यापीठातून अर्थशास्त्रात बीए आणि एमए केले आणि काही वर्षे याच विद्यापीठात अध्यापनाची जबाबदारी स्वीकारली. फुलब्राईट स्कॉलरशीपद्वारे ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. तिथल्या व्हंडरबिल्ट युनिव्हर्सिटीतून त्यांनी अर्थशास्त्रात पीएच. डी. मिळवली आणि तिथेही काही काळ त्यांनी अध्यापनाचा मार्ग निवडला. त्यावेळी बांगलादेश मुक्ती संग्राम ऐन भरात होता. मायदेशाबद्दल अपार जिव्हाळा असलेल्या युनुस यांना स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यांनी पाकिस्तानला होणारी लष्करी मदत रोखण्यासाठी अमेरिकी संसदेच्या नेत्यांकडे विनवणी केली. शिवाय, वॉशिंग्टनमध्ये 'बांगलादेश इन्फॉर्मेशन सेंटर' सुरू करून त्यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात अमेरिकेतून बळ दिले. बांगलादेश स्वातंत्र्यानंतर त्यांनी मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला आणि १९७२मध्ये चितगोंग विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली.स्वातंत्र्यानंतर स्थिरस्थावर होत असतानाच बांगलादेश भीषण दुष्काळात भरडला गेला. त्यात देशातील सुमारे दीड कोटी नागरिकांचा बळी गेला. गरिबांबद्दल कणव असलेल्या युनूस यांना हे दुःख असह्य झाले. विद्यापीठाच्या वर्गात अर्थशास्त्राचे धडे देण्यापेक्षा ते दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रत्यक्षात अमलात आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला. दुष्काळापीडितांचे प्रत्यक्ष नुकसान झालेले नसेल तर त्यांना बँका कर्ज देत नसल्याचे युनूस यांना आढळले. त्यामुळे सुरुवातीला त्यांनी स्वतः ४२ कुटुंबांना कर्ज दिले. त्यातून व्यवहारांना चालना मिळेल, असा त्यांचा प्रयत्न होता. 'गरीब कर्जासाठी अपात्र नाहीत. त्यांना कर्ज मिळायलाच हवे. वाजवी व्याजदराने कर्ज दिले तर ते वेळेवर कर्जफेडही करतात', असे युनूस यांचा अनुभव. त्यातूनच पुढे ग्रामीण बँकेचा प्रयोग आकारला आला. 'माझ्या सभोवती दारिद्र्यच दारिद्र्य दिसत होते. मी त्याकडे दुर्लक्ष करू शकलो नाही. मला या पिचलेल्या लोकांसाठी काहीतरी करायचे होते म्हणून मी हे काम हाती घेतले. पण, ते धोरणकर्ता किंवा संशोधक म्हणून नव्हे', असे युनूस म्हणतात. मात्र, त्यांनी केलेले काम अस्सल धोरणकर्त्यासारखेच पथदर्शी आहे.सर्वसाधारणपणे जे कर्ज मिळवण्यास अपात्र ठरतात त्यांना छोटी-छोटी कर्जे वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवून १९८३मध्ये युनूस यांनी ग्रामीण बँकेची स्थापना केली. दुष्काळामुळे प्रत्यक्ष नुकसान झालेले असो वा नसो, गरिबांना कर्जवितरणावर बँकेने भर दिला. अल्पावधीतच बांगलादेशात ग्रामीण बँकेने पाय घट्ट रोवले. बँकेने कर्ज वितरणावेळी '१८ निर्णय' अशी अनोखी संकल्पना राबवली. त्यानुसार, कर्जदाराला काही निर्णयांचे पालन करण्याचे वचन घ्यावे लागे. उदा. आपल्या मुलांना शिक्षण देऊ, आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करू, वगैरे वचन कर्जदारांना देणे बंधनकारक होते. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. महिला सक्षमीकरणाला बळकटी मिळाली, शाळेतील पटसंख्या वाढू लागली, घरांत स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जाऊ लागले, बालमृत्यूचे प्रमाण घटू लागले. ही बँक इतकी यशस्वी झाली की अगदी भिक्षेकऱ्यांनाही कर्ज मिळत होते. बँकेने बांगलादेशच्या समाजव्यवस्थेत नवे परिवर्तन घडविले. त्यामुळेच मोहम्मद युनूस आणि ग्रामीण बँकेला सन २००६च्या नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.आज चार दशकांनंतर या बँकेच्या कर्जदारांची संख्या एक कोटी ६० लाख आहे. त्यात महिलांची संख्या ९७ टक्के आहे. बँकेने आत्तापर्यंत ३८ अब्ज डॉलरचे कर्जवितरण केले. कर्जवसुलीचे प्रमाण ९६.३ टक्के इतके उच्च आहे. देशातील द्रारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात या बँकेचे मोठे योगदान आहे. सध्या देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सुमारे १८ टक्के इतके कमी आहे. या बँकेच्या यशानंतर जगभरात सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था पुढे आल्या. भारतात विशेषतः पश्चिम बंगालमधील बंधन ही वित्तसंस्था त्यापैकीच एक. जगातील सुमारे १०० देशांनी ग्रामीण बँकेचे अनुकरण केले आहे. हे या बँकेचे यश असले तरी तिचे टीकाकारही कमी नाहीत. ग्रामीण बँकेच्या काही योजनांमध्ये जादा व्याजदरामुळे कर्जदार आणखी गाळात जातात, असे या टिकाकारांचे म्हणणे. त्यावर, 'पैसे कमावणे नव्हे, तर गरिबांना मदत करणे आणि छोट्या उद्योगांना अर्थबळ देणे हेच बँकेचे उद्दिष्ट आहे', असे प्रत्युत्तर युनूस देतात.देशातील जनक्षोभानंतर पदच्युत होऊन अज्ञातवासात गेलेल्या शेख हसीना आणि मोहम्मद युनूस यांच्यात याआधी अनेकदा संघर्ष झाला. 'ग्रामीण बँक ही स्वतःची मालमत्ता असल्यासारखे युनूस यांचे वर्तन असून, ही बँक गरिबांच्या रक्ताचे शोषण करीत आहे', अशी टीका हसीना यांनी केली होती. एवढेच नव्हे, तर हसीना यांनी निवृत्तीवयाच्या नियमावर बोट ठेवून या बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकपदावरून युनूस यांना दूर केले. मात्र, त्यानंतरही देशासह जगभरात युनूस यांच्याभोवती असलेले वलय कमी झाले नाही.युनूस यांनी सन २००७मध्ये सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर 'नागरिक शक्ती पक्ष' नावाच्या राजकीय पक्षाची घोषणा केली होती. मात्र, त्यांना अपेक्षित पाठबळ मिळाले नाही. शिवाय हसीना यांनी त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावला होता. 'राजकारणातील नवखे हे नेहमीच धोकादायक असतात, त्यांच्यापासून सावध राहायला हवे', अशी खोचक टिप्पणी हसीना यांनी केली होती. अखेर काही महिन्यांतच युनूस यांनी राजकीय पक्षाचा विचारच सोडून दिला. त्यानंतरही बदनामीचा खटला, करचुकवेगिरी आदींचे आरोप त्यांच्यावर झाले. कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायालयाने गेल्या जानेवारीत युनूस यांना सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षाही सुनावली. अलीकडेच युनूस यांच्यावर दूरसंचार कंपनीतील कर्मचारी कल्याण निधीतील २.२ दशलक्ष डॉलर्सच्या अपहाराचा आरोप ठेवण्यात आला. गैरव्यवहार आणि नियम उल्लंघनाचे सुमारे १५० गुन्हे युनूस यांच्यावर आहेत. मात्र, हे सर्व गुन्हे खोटे आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा युनूस यांचा दावा आहे. देशाच्या जनक्षोभाचे जनक ठरलेल्या विद्यार्थी आंदोलकांनाही त्याची कल्पना असावी. त्यामुळेच त्यांनी या महत्त्वाच्या टप्प्यावर नेतृत्वासाठी युनूस यांची निवड केली.युनूस यांनी अलीकडेच तीन शून्यांची संकल्पना मांडली होती. 'शून्य दारिद्र्य, शून्य बेरोजगारी आणि शून्य कर्बउत्सर्जन' ही ती संकल्पना. त्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित असल्याचे युनूस यांनी म्हटले आहे. बांगलादेशचा 'हंगामी प्रमुख' म्हणून युनूस यांना फार मोकळीक मिळणार नाही. मात्र, या निर्णायक वळणावर स्वकल्पनेप्रमाणे देशाला दिशा देण्याची संधी त्यांना आहे.

# सरकारने सरसकट तीन लाखापर्यंतचे कर्ज माफ करावे

## सरसकट कर्जमाफी बाबत सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.बाबु भिमराज देवकर यांचे कृषी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांना पत्र

## पीक विम्याच सांगायचं म्हणजे गावात काही जणांना भरपूर भेटला तर बहुतेक जणांना काहीच भेटला नाही अशी राज्यात परिस्थिती

## सरकारने कर्जमाफी करावी असे शेतकऱ्यांच्या मनात आहे पण दुष्काळी अनुदानाचीच पैसे अजून आलेले नाहीत









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महाराष्ट्र सरकारने ही तात्काळ शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी अशी मागणी शेती प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी व संघटनांनी केली आहे.अनेक राज्यांनी वेगवेगळ्या शेतकरी कर्जमाफी योजना सुरू केल्या आहेत महाराष्ट्राची चंद्रन योजनापंजाबची किसान राहत योजना परंतु सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांना त्यांच्या कर्जातून मुक्त करणे हे उद्दिष्ट असते.परंतु महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफीत भरडला जात आहे सरकारने उद्योगपतींना दहा लाख रुपये कर्ज माफ केलं मग शेतकरी कर्जमाफी का नाही? याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे अनेकाने म्हटले पण सरकार त्याची अंमलबजावणी कधी करणार असा प्रश्न निर्माण होत आहे.महाराष्ट्रात काही प्रमाणात अल्पभूधारक शेतकरी आहे तसेच कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी गरजेचे आहे कारण शेतकरी हे जमीन गहाण ठेवत असतात.शेती उद्योगधंद्याचे नापिकीकरण; कर्जबाजारीपणा;पिकांना योग्य हमीभाव न मिळणे यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होतं त्यामुळे ग्रामीण भागात सरसकट कर्जमाफी गरजेच्या इतर योजनांसाठी कोणत्या वर्षीची तरतूद करण्यात आली असताना सरकारने सरसकट कर्जमाफी कडे ही सकारात्मक पहावे. शेतकरी आत्महत्या हा देखील ज्वलंत विषय त्याकडेही सरकारनं पाहावं त्यामुळे शेतकरी कर्जमाफी तात्पुरता उपाय आहे.शेतकरी आत्महत्या थांबत नाहीत व शेतीमधून नफा मिळवता येतो हा आत्मविश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की शेतकऱ्यांच्या मालाला भाव द्या. त्यांना सरकारचे दोन दोन हजारांची मदत नको व किमती नियंत्रणात ठेवा.त्याचबरोबर राज्य सरकारने मोदी-शाह यांच्याशी बोलून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी तातडीने विचार करावा. शेतकऱ्यांना ३० दिवसात कर्जमाफी द्यावी, अशीही मागणी केल्याचे सत्तार म्हणाले.तसेच या कर्जमाफीसाठी केंद्रासह राज्याने काही वाटा उचलावा.याची सध्या पडताळीणी सुरू असून तशी माहिती गोळा केली जात आहे. सरकारची यथाशक्ती,सरकारचे उत्पन्न याचा विचार करून सरकारची कर्जमाफीबाबत ही सहानुभूतीची असल्याचे मंत्री अब्दुल सत्तार म्हटले होते. त्याची अंमलबजावणी कधी करणार हा प्रश्न निर्माण होत आहे.त्यामुळे सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.बाबु भिमराज देवकर यांनी कृषिमंत्री श्री धनंजय मुंडे साहेब यांना जनहितार्थ कर्जमाफी बाबत पत्र पाठवले आहे.

# आष्टीत ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते १०१ फुटी तिरंगा

# ध्वजारोहण संपन्न;भारतमातेच्या जयघोषाने शहर दुमदुमले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

वंदे मातरम्,भारत माता की जय,हर घर तिरंगा,घर घर तिरंगा तसेच देशभक्ती पर गीते,हजारो विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये १०१ फुटी तिरंगा ध्वजारोहण कार्यक्रम मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी थाटात संपन्न झाला.

प्रत्येकांच्या हाती असलेला तिरंगा ध्वजाणे, आणि भारत मातेच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा घर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत केलेल्या आवाहनाला गतवर्षीप्रमाणे याही वर्षी आष्टीकारांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद याचाच एक भाग म्हणून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ तसेच सुरेश धस मित्रमंडळ यांच्यासह तहसील प्रशासन, नगरपंचायत प्रशासन, गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शहरातील सर्व शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यासह सामाजिक,शैक्षणिक, व्यापारी,आजी माजी त्रिदल संघटना,पोलिस,पत्रकार व विविध क्षेत्रातील हजारो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी १०१ फुट लांबीच्या ध्वज स्तंभावर तिरंगाचे ध्वजारोहण जेष्ठ नागरिकाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम,हर घर तिरंगा घर घर तिरंगा अशा घोषणांचा जयघोष करत संपूर्ण शहर दणाणून गेले होते.



### आज विद्युत रोषणाई व फटाक्यांची आतषबाजी

**आज बुधवार दिनांक १४ रोजी सायंकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आकर्षक विद्युत रोषणाई तसेच फटाक्यांची आतषबाजी होणार असून सर्व आष्टीकर तसेच परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन राधेश्याम धस यांनी केले आहे.**

# एक दिवशिय विपश्यना शिबिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

दि १३ दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी , रविवारला विपश्यना ध्यान साधना केन्द्र ढाणकी रोड उमरखेड येथे होणार आहे. विपश्यना ध्यान साधना वेळ सकाळी १०:०० ते दुपारी०४:०० या वेळात जुन्या साधक/साधिकाकरीता एक दिवशिय विपश्यना शिबीराचे आयोजन केले आहे.या शिबीराचे संचालन करण्याकरिता नांदेडहून आचार्य भदंत पय्यारत्न येत आहेत.ज्यांनी १० दिवशिय विपश्यना कोर्स पूर्ण केले आहे ते या शिबीरामध्ये सहभागी होऊ शकतात.

शिबीर स्थळी दुपारच्या भोजनाची व्यवस्था केली आहे.

विपश्यना ध्यान साधना केंद्र बालाजी नगर धानकी रोड उमरखेड जिल्हा यवतमाळ रजिस्टेशन करीता सम्पर्क नंबर:- ९४०४८२७४६३/ ९७६७४४७२१२ सर्वांच मंगल हो.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त टाकळसिंग येथे १३ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नागरिक रोहिदास नेटके यांच्यात हस्ते ध्वजारोहण संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील १५ ऑगस्ट दिनानिमित्त १३ अगस्त रोजी ज्येष्ठ नागरिक रोहिदास नेटके यांच्या हस्ते झेंडा फडकण्यात आला यावेळी माजी सभापती बद्रीनाथ जगताप,ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष तथा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष माननीय श्री नवनाथ लोंढे,सरपंच भलभिम मुरलीधर वाघमोडे,माजी उपसरपंच संपत जगताप,मुख्याध्यापक महेश कुमार शिंदे व सर्व शिक्षक वर्ग, सर्व ज्येष्ठ नागरिक व ग्रामपंचायत सदस्य,संजय नाथा कुमकर, सुखदेव जगताप,दत्तात्रय धस, युवराज नेटके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



# कुकडी प्रकल्पाचे ओव्हर फ्लोचे

# पाणी सीना व मेहकरी धरणात सोडा

## सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांची जिल्हाधिकारी व मुख्य अभियंता यांना निवेदनाद्वारे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



पावसाळा सुरू होऊन अडीच महिने लोटले तरी आष्टी तालुक्यामध्ये दमदार असा पाऊस झालेला नाही.त्यामुळे तालुक्यात काही गावात पाण्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. तालुक्यातील निंबोडी तलाव वगळता एकही तलाव भरलेला नाही.त्यामुळे कुकडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे ८० टक्के अधिक क्षमतेने सर्व धरणे भरलेले आहेत. कुकडीचे अतिरिक्त पाणी भीमा खोऱ्यातील श्रीगोंदा कर्जत व करमाळा तालुक्यातील सर्व तलाव व नदीच्या पात्रात सोडून बंधारे भरून घेतली जात आहेत. आष्टी तालुक्यातील पश्चिम बाजूच्या गावांना व परिसरात समाधानकारक पाऊस नसल्यामुळे या भागातील तलाव नदी अद्याप कोरडेठाक पडले असून या परिसरातील विहिरींची व कुंपणलिकेच्या पाण्याची पातळी खालावली आहे. पावसाळा सुरू होऊन अडीच महिने झाले तरी नदीचे पात्र व बंधारे कोरडेठाक आहेत.त्यामुळे कुकडीचे प्रकल्पाचे ओव्हर फ्लो चे पाणी भोसा खिंड मार्गे सीना धरणातून मेहेकरी धरणात सोडण्यात यावे.यामुळे मेहेकरी, आनंदवाडी, सराटेवडगाव, टाकळी रुई ,शिराळ, फत्तेवडगाव, वाकी, दैठणा, चिखली, हिंगणी, टाकळसिंग, सांगवी आष्टी, खडकत यासह परिसरातील गावांना फायदा होणार आहे.त्यामुळे तात्काळ कुकडे प्रकल्पाचे ओव्हर फ्लो चे पाणी तात्काळ मेहेकरी धरणात सोडावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आष्टी विधानसभा अध्यक्ष (शरदचंद्रजी पवार गट) राम खाडे यांनी बीडचे जिल्हाधिकारी व छत्रपती संभाजीनगर चे (पाटबंधारे विभाग) मुख्य अभियंता यांना सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

# विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी

# कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे-विजय चौगुले

## शिवसेनेची जम्बो कार्यकारणी जाहीर, कल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याच्या सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने सर्वसामान्य जनतेसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सांगोला तालुका शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, विद्यार्थी संघटना, ओबीसी सेल, एससी सेल पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत .नवी मुंबईचे जिल्हाप्रमुख तथा सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले व आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. आगामी विधानसभा निवडणुकीत सांगोला विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन सांगोला विधानसभा निवडणूक प्रभारी विजय चौगुले यांनी केले.

शिवसेना ओबीसी आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी शिवाजी घेरडे, महिला आघाडी तालुका प्रमुखपदी राणीताई माने, शिवसेना एससी आघाडी तालुका प्रमुखपदी दीपक ऐवळे, महिला आघाडी तालुका उपप्रमुखपदी दीपाली नलवडे, शिवसेना सोलापूर जिल्हा उपसंघटकपदी पांडुरंग मिसाळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी जगदीश पाटील, उपजिल्हा संघटक पांडुरंग मिसाळ, अशोक भालके, विधानसभा प्रमुख प्रा.संजय देशमुख, विधानसभा समन्वयक सुभाष इंगोले, तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, तालुका संघटक युवराज पाटील, तालुका उपप्रमुख अरुण नागणे, तानाजी भोसले, सोमनाथ मरगर, बिरू आलदर, बाळकृष्ण सावंत, दादासो वाघमोडे, संतोष रोकडे, प्रभाकर चव्हाण, तालुका सहसंघटक तात्यासो पाटील, महादेव घोडके,दगडू बाबर, बाळासो भोसले, राहुल घोंगडे, तालुका समन्वयक संजय गायकवाड, नामदेव पाटील, सूर्यकांत सोळसे, भगवान कदम, नितीन चव्हाण, उदयसिंह घाडगे, युवराज भोसले, राजेंद्र पवार, रणसिंह देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना शहरप्रमुखपदी ज्ञानेश्वर तेली, शहर उपप्रमुखपदी सोमेश यावलकर, विजय इंगोले, सुनील धतींगे, अस्मिर तांबोळी, गणेश माळी, महेश कदम, शहर संघटकपदी आनंदा माने, शहर





सहसंघटक अरुण पाटील, समन्वयक अरुण बिले, सहसमन्वयक अच्युत फुले, प्रसिद्धी प्रमुखपदी आनंद दौंडे यांची निवड करण्यात आली आहे. युवासेनेच्या शहरप्रमुखपदी समीर पाटील, युवासेना शहर उपप्रमुख सुजित भोकरे, आकाश घोंगडे, चैतन्य राऊत, अजय सुरवसे, काशिलिंग गाडेकर, सागर नरूटे, युवा संघटकपदी राजपाल चांडोले, युवा सहसंघटकपदी साहेबराव जाधव, युवा समन्वयक शंकर महादेव मेटकरी, युवा सहसमन्वयक अनिकेत महिमकर यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना महिला आघाडीच्या शहर प्रमुखपदी छाया मेटकरी, महिला शहर उपप्रमुख अप्सरा ठोकळे, लतिका मोटे, मनीषा लिगाडे, रोहिणी बनसोडे, झाकीरा तांबोळी, महिला शहर संघटकपदी रुकसाना मुजावर, महिला शहर समन्वयक शोभा घोंगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना ओबीसी सेलच्या शहर प्रमुखपदी आयुब मुलाणी, ओबीसी सेल शहर उपप्रमुख नितिकेश तेली, प्रफुल्ल सादिगले, संग्राम सक्रे, गौरव काळे, दीपक पोरे, अशपाक मुलाणी, शेखर टेके, ओबीसी सेल शहर समन्वयकपदी तोहीद शेख, ओबीसी सेल शहर संघटकपदी प्रभाकर घोंगडे, ओबीसी सेल शहर सहसंघटकपदी निलेश म्हेत्रे यांची निवड करण्यात आली. शिवसेना एससी सेल शहर प्रमुखपदी कीर्तीपाल बनसोडे, एससी सेल शहर उपप्रमुख राजेंद्र बनसोडे, आनंद बनसोडे, नवज्योत ठोकळे, जितेंद्र चंदनशिवे, प्रशांत माळगे, एससी सेल शहर समन्वयक शरद रणदिवे, एससी सेल शहर सहसमन्वयक विनोद ढोबळे, एससी सेल शहर संघटक वैभव बनसोडे, एससी सेल शहर सहसंघटक अवि करडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# फुले,आंबेडकर,कलाम,यांच्या विचारांचा आदर्श घेत यशस्वी व्हा-तहसिलदार रामेश्वर गोरे

## यशस्वी होण्यासाठी नियमित मेहनत परिश्रम करावी लागते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

महात्मा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम हे संपूर्ण जगाला वंदनीय असून त्यांनी शुन्यातुन इतिहास घडवला,त्यांचे कार्य हे अजरामर असुन येणाऱ्या पिढीला सतत प्रेरणादायी आहे,त्यामुळे युवक तरुण मित्रांनी प्रतिकुल परिस्थीतीला दोष न देता आहोरात्र कठोर परिक्षम घेत यशस्वी व्हावे असे अवाहन कंधार चे तहसिलदार तथा न.पा.चे मुख्याधिकारी रामेश्वर गोरे यांनी केले,

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे प्रणेते पद्मश्री डॉ.शियाली रामामृतन रंगनाथन यांची १३२ वी जयंती दि,१२ ऑगस्ट रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय नगरपरिषद कंधार येथे ग्रंथ प्रदर्शन करून साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम कार्यक्रमास उपस्थित असलेले कंधार चे तहसिलदार तथा न.पा.चे मुख्याधिकारी रामेश्वर गोरे यांनी, डॉ.एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले,

या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गोरे म्हणाले की कंधार हे एक ऐतिहासिक शहर असून या शहराला मोठा इतिहास आहे,येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय हे समृद्ध वाचनालय असून येथे विपुल ग्रंथसंपदा आहे,येणारा काळ हा स्पर्धेचा असून या काळामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर झोकून देऊन कष्ट करा,चांगल्या गोष्टीचा अंगीकार करा मोबाईलचा गैरवापर टाळा व वाईट व्यसनांपासून दूर रहा जीवन जगण्यासाठी खूप मार्ग आहेत,मेहनत घ्या,संघर्ष करा,आयुष्य हे सुंदर आहे,त्याचा उपभोग घ्या,असे आव्हान गोरे यांनी यावेळी केले,

या कार्यक्रमांच्या वेळी मोहम्मद रफीक सत्तार यांनी पद्मश्री डॉ.एस आर रंगनाथन यांच्या ग्रंथालय शास्त्रासाठी अमूल्यकार्य केलेल्या कार्याबद्दलबद्दल माहिती दिली.तसेच मधुकर धर्मापुरीकर साहित्यिक व निवृत्त एडिटर नांदेड,यांच्यातर्फे ग्रंथालयास देणगी स्वरूपात प्राप्त झालेले नवीन ग्रंथाचे एकदिवसीय ग्रंथ प्रदर्शनाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

तहसिलदार गोरे यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी तयारी करत असलेल्या उपस्थित विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी अयशस्वी होणार नाही,यापैकी सर्वच सर्व विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतील,अशी अपेक्षा व्यक्त केली.तसेच विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी सरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विविध रूपाने सत्कार करण्यात येईल,असेही विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले.तसेच नवीन पुस्तके खरेदी करण्याची असल्याने विद्यार्थ्यांना हवी असलेली नवीन पुस्तकांची यादी दि.१४ ऑगस्ट पर्यंत करून देण्यासाठी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी केलेली आसन व्यवस्थेची मागणी लवकरच पूर्ण करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले,यावेळी मोठ्या संख्येत विद्यार्थी उपस्थित होते,तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी दता ऐनवाड, मिलिंद महाराज,यांनी परिश्रम घेतले.



# कंधार येथे शिवसेना (उबाठा) आयोजीत भगवा सप्ताह;सदस्य नोंदणी अभियान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे तालुका शाखा कंधार यांच्या कडून दि.१३ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय कंधार परिसरात भगवा सप्ताह कार्यक्रमा अंतर्गत नवीन सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले.

यावेळी तालुकास्तरीय सदस्य नोंदणी अभियानात तालुक्यांतील शहरातील तरुण, महिला,शेतकरी,जुन्या नव्या शिवसैनिक यांनी यात भाग मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यामुळे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने सर्वाचे आभार देखील मानण्यात आले आहेत.

आजच्या सदस्य नोंदणी अभियानात तरुण,युवक, महिला,शेतकरी मोठ्या प्रमाणत प्रतिसाद मिळाला त्यामुळे कार्यकर्ते आणि नेते याच्या मध्ये उत्साह संचारला असून आजचे अभियान यशस्वी करण्यासाठी शिवसेना राज्यसंघटक एकनाथदादा पवार,मुक्तेश्वर भाऊ धोंडगे,यांचे मार्गदर्शनाखाली, जिल्हा संघटक गणेश भाऊ कुंटेवार याच्या उपस्थितीत,

विधानसभा प्रमुख भाऊसाहेब कदम,तालुका प्रमुख सचिन पेठकर, शहर तालुका प्रमुख अतुल पापिनवार, रविराज जाधव जिल्हा समन्वयक शिक्षक सेना नांदेड यांनी हे अभियान यशस्वी करण्यासाठी तर अभियानासाठी उपतालुकाप्रमुख उमाकांत जोगदंड,उपतालुकाप्रमुख संतोष वडवळे, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख मुस्तफा शेख, युवासेना संदीप मंगनाळे, आलीम शेख,वेंकटेश फुले, व्यंकटराव आढाव,रमेश लुंगारे, रहीम शेख, जब्बार खान, सय्यद अजिम,महेंद्र गायकवाड, प्रल्हाद जाधव, हणमंत कदम, आनंदा वंजे, विश्वनाथ भुरे, युनूस शेख, रियाझ शेख,शेख आवेस,विकी जोंधळे,अमीर शेख,बबलू गायकवाड, साईनाथ जोगले, वैभव जवादवाड, आदी पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी यासाठी मेहनत घेतली.

### दैनिक लोकनेता ने दिलेल्या बातमीचा परिणाम लोणी सय्यदमीर येथिल

# रस्त्यावरील खड्डे बुजवण्याबाबत कार्यवाही करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाला माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देश

## दैनिक लोकनेताने दिलेल्या कोणत्याही गाडीवर फिरा आणि खड्डे मोजाया बातमीचा परिणाम-सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री बाबू भिमराज देवकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**






सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री बाबू भिमराज देवकर यांनी मुख्यमंत्री मा.ना.श्री एकनाथ शिंदे यांना खड्डे बुजवण्याबाबत दि.९ ऑगस्ट रोजी एक निवेदन दिले होते.त्याचा परिणाम सकारात्मक पाहायला मिळाला.व त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे साहेब यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांना श्री बाबू भिमराज देवकर यांच्या निवेदनावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.यासंदर्भातली बातमी दैनिक लोकनेताने ९ ऑगस्ट रोजी प्रकाशित केली होती.सामाजिक कार्यकर्ते श्री बाबू भिमराज देवकर यांना त्याबाबतचा अधिकृत मेल प्राप्त झाला आहे. मौजे लोणी सय्यदमिर या ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडले असून ते मार्गावर प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना प्रवास करताना धोकादायक ठरत आहेत.याच खड्ड्यांमुळे अनेक लोकांना कायमचे अपंगत्व आले असून. त्याबाबतचे निवेदन माहिती तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. बाबू भिमराज देवकर यांनी मुख्यमंत्री महोदय यांना निवेदनात स्पष्ट केले होते.त्याची दखल घेऊन सर्वजनिक बांधकाम विभाग यांना पुढील कार्यवाही करण्याचे आदेश श्री मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांनी संबंधित विभागाला दिल्याने सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते श्री बाबू भिमराज देवकर यांचे संपूर्ण तालुक्यात अभिनंदन होत आहे.

# विचारवंतांची जयंती वैचारिक पद्धतीने साजरी करणार-कॉ.महादेव नागरगोजे

## लोक शाहीर आण्णाभाऊ साठे व कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांची संयुक्त जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

ज्यांनी आपले पुर्ण आयुष्य शोषित, पिडीत शेतकऱ्यांसाठी अर्पित केले अश्या थोर विचारवंतांची जयंती आपण दारू पिऊन डिजे च्या तालावर उड्या मारून साजरी करीत असाल तर त्या थोर विचारवंतांना कसे वाटत असेल याचं ही नवतरूणांनी भान ठेवले पाहिजे. लोक शाहीर आण्णाभाऊ साठे यांनी पुर्ण आयुष्य अन्याया विरोधात आपल्या साहित्याच्या माध्यमातून लढा उभा केला व तो यशस्वी केला तर खा.कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू घेत त्यांना सर्वात पहिली कर्ज माफी मिळवून दिली अश्या महापुरुषांच्या जयंती त्यांच्या विचारांची पेरणी करणारे कार्यक्रम आयोजित करणारे असावे मात्र सध्याची परिस्थिती पाहता मन व्यतित होत आहे. त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन आम्ही कार्यरत राहणार असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे आयोजक कॉ.महादेव नागरगोजे यांनी केले. कॉ.लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व बीड जिल्ह्याचे मा.खा.कॉ. क्रांतीसिंह नाना पाटील यांची संयुक्त जयंती दिनांक-११ ऑगस्ट-२०२४ रविवार रोजी रेणुका माता मंदिरच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून अखिल भारतीय किसान सभाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ.राजन क्षिरसागर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष सचिव मंडळ सदस्य कॉ.नामदेव चव्हाण, भारतीय शेतकरी





कामगार पक्ष युवा नेते भाई मोहन गुंड, प्रा.तांदळे यांची होती. या वेळी विविध शाळेत साहित्यरत्न लोक शाहीर आण्णाभाऊ साठे व कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्यावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्या मध्ये प्रत्येकी शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय स्पर्धक निवडण्यात आले होते. त्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहनपर रोख बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी कॉ.राजन क्षिरसागर यांनी कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या पाटोदा शहरात स्मारक मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले तर शेतकऱ्यांवर केंद्र व राज्य सरकार कसे अन्याय करत आहे. या वर भाष्य केले, तसेच भाई मोहन गुंड, प्रा.तांदळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे पुस्तके मोफत उपलब्ध करून देणार असल्याचे जाहीर केले. या वेळी व्यासपीठावर प्रा.सुशिलाताई मोराळे, युवा नेते गणेश कवडे, जेष्ठ समाजसेवक दलित मित्र एकबाल पेंटर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन कु.सुरेखाताई खेडकर यांनी केले. तर भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आभार व्यक्त केले.

# बाळासाहेब पाटोदे यांचा असंख्य कार्यकर्त्यासमवेत बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार मध्ये जाहीर प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

येथील भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष तथा पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्य युवा नेते बाळासाहेब पाटोदे यांचा आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात जाहीर प्रवेश होणार आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील, खा. सुप्रिया सुळे, खा. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत आज उदगीर येथे शिवस्वराज्य यात्रा उदगीर येथे येणार आहे. या कार्यक्रमात मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत माजी आमदार



सुधाकर भालेराव यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेब पाटोदे हे आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश करणार आहेत.बाळासाहेब पाटोदे हे एक युवा नेतृत्व असून त्यांचे उदगीर शहरात कार्यकर्त्यांचे मोठे संघटन आहे. मराठा समाजातील एक दमदार नेतृत्व म्हणून बाळासाहेब पाटोदे परिचित असून त्यांचा आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला होणार आहे. आगामी काळात आपण माजी आमदार सुधाकर भालेराव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश करणार असून आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी काम करणार असल्याचे बाळासाहेब पाटोदे यांनी सांगितले.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904